# परीपत्रक

मिशन शाळा विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील प्लॉट क्रमांक २७ मधील आंबा फळबहाराचा जाहीर लिलाव दिनांक. ०५/०३/२०२० ला दुपारी ३.३० वाजता विभागाच्या कार्यालया मध्ये करण्यात येणार आहे. तरी इच्छुक व्यापा-यांनी लिलावात भाग घेण्याकरिता विभागावर हजर रहावे. लिलावाच्या अटी व शर्ती सोबत जोडलेल्या आहेत.

संचालक,<br>
मध्यवर्ती संशोधन केंद्र,<br>
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

C/1

# मिशन शाळा विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## आंबा फळबहाराचा जाहीर लिलाव

अटी व शर्ती

१. आंबा फळबहाराचा जाहीर लिलाव ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर करण्यात येईल.

२. कमीतकमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.

३. बोलीमध्ये भाग घेण्यापुर्वी खरेदीदारांना बोलीत भाग घेण्याकरीता रू १०००/- अनामत रक्कम जमा करावी लागेल. लिलाव घेतला असेल त्याचे व्यतिरिक्त सर्वाची रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल.

४. लिलावाची ७५ टक्के रक्कम लिलावाच्या दिवशी त्याच ठिकाणी भरावी लागेल व उर्वरित २५ टक्के रक्कम लिलाव झाल्यानंतर ७ (सात) दिवसाच्या आत भरावी लागेल. अन्यथा लिलाव समिती एकतर्फी निर्णय घेऊन लिलाव रद्द करू शकेल.

५. जेवढया रकमेचा लिलाव झाला असेलत्या रकमेच्या १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) लिलावाच्या दिवशीच भरणा करावी लागेल (लिलाव रकमेच्या व्यतीरिक्त).

६. खते, ओलीत, पिक संरक्षण किंवा अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार/ उपलब्धतेनुसारच केल्या जाईल.

७. झाडांना पाणी देण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणी पुरवठा केला जाईल.

८. नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याकरिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

९. संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता प्रभारी अधिकारी, मिशन शाळा विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या नावाने अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

१०. सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

११. लिलावात भागघेणा-याची संख्या कमी असल्यास लिलाव प्रक्रीया रद्द करण्यात येईल व पुढच्या तारखेला लिलाव ठेवण्यात येईल.

१२. लिलावाची अपेक्षीत रक्कम न आल्यास लिलाव नामंजुर करण्याचे अधिकार लिलाव समितीकडे राहतील.

१३. लिलावास अंतिम मान्यता मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, यांची राहील. अंतिम मान्यता मिळाल्या शिवाय लिलाव प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

१४. झाडांची फळे तोडतांना झाडाची फांदी तुटणार नाही याची काळजी व्यापा-यास घ्यावी लागेल.

१५. रखवालदार ठेवल्यास त्याची माहीती प्रभारी अधिकारी यांना दयावी लागेल.

Officer Incharge
Mission School Block,
C.R.S. Dr. P.D.K.V. Akola.

१६. आंबा फळांच्या व्यतीरिक्त बाहेरील इतर दुसरी फळे विभागाच्या परीसरात विक्री करिता आणता येणार नाही. तसेच प्रक्षेत्रावर दुकाण लावता येणार नाही.

१७. लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबधीत खरेदीदारास स्वखर्चाने रु १००/- चे जनरल स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.

१८. कोणत्याही कारणावरून खरेदीदार व केंद्राचे अधिकारी यांच्या मध्ये वाद निर्माण झाल्यास मा. संचालक संशोधन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

१९. फळे तोडण्याची अंतिम तारीख ०४.०६.२०२१ ही असेल.

प्रभारी अधिकारी
मिशन शाळा विभाग
म.सं.कें., डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला